सुराज्य
रविवार, दि. २७ ऑक्टोबर २०२४ । पान १२

# माढा, मोहोळ, पंढरपुरात शरद पवारांचा 'प्लॅन' काय?



## दुसरी जाहीर आता प्रतिक्षा तिसऱ्या यादीची

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर झाली आहे. प्रदेशाध्यक्ष जंयत पाटील यांनी २२ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. मात्र, यामध्ये काही मतदारसंघातील उमेदवारांची नावे गुलदस्त्यातच ठेवली आहेत. यामध्ये माढा, पंढरपूर आणि मोहोळ या मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात शरद पवार यांचा नेमका प्लॅन काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.**

माढा, पंढरपूर आणि मोहोळ या मतदारसंघातून शरद पवार यांच्या गटाकडून निवडणूक लढवण्यासाठी अनेक उमेदवार इच्छुक आहेत. त्यामुळं उमेदवारी कोणाला द्यायची असा पेच निर्माण झाला आहे. तानाजी सावंतांविरुद्ध शरद पवारांनी भाकरी फिरवली. परांडा विधानसभा मतदारसंघातून तीन वेळा आमदार राहिलेल्या राहुल मोटे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्याविरोधात त्यांचा सामना होणार आहे.

दरम्यान, परांडा विधानसभा मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटाकडून दिवंगत माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांचा मुलगा रणजित पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, शरद पवार गटानं या जागेवर दावा केला होता. त्यामुळं ठाकरे गटानं माघार घेतल्याचं बोललं जात आहे. आता परांडा मतदारसंघातून तानाजी सावंत विरुद्ध राहुल मोटे असा सामना होणार आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे जो देतील तेच काम करणार असल्याची भूमिका रणजित पाटील यांनी मांडली आहे.

### शरद पवार गटाच्या आज जाहीर केलेले २२ उमेदवार

एरंडोल : सतीश अण्णा पाटील, गंगापूर: सतीश चव्हाण, शहापूर : पांडुरंग बरोरा, परांडा : राहुल मोटे, बीड: संदीप क्षीरसागर, आर्वी: मयुरा काळे, बागलान : दीपिका चव्हाण, येवला : माणिकराव शिंदे, सिन्नर : उदय सांगळे, दिंडोरी : सुनीता चारोस्कर, नाशिक : पूर्व गणेश गीते, उल्हासनगर : ओमी कलानी, जुन्नर : सत्यशील शेरकर, पिंपरी : सुलक्षणा शीलवंत, खडकवासला :सचिन दोडके, पर्वती : अश्विनीताई कदम, अकोले :अमित भांगरे, अहिल्यानगर शहर : अभिषेक कळमकर, माळशिरस : उत्तमराव जानकर, फलटण : दीपक चव्हाण, चंदगड: नंदिनीताई भाबुळकर कुपेकर, इचलकरंजी : मदन कारंडे.

### आता तिसऱ्या यादीची प्रतिक्षा...

शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाने यापूर्वी ४५ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. त्यानंतर आज (दि.२६) २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तिसरी यादी देखील जाहीर करण्यात येणार आहे. जयंत पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार आज संध्याकाळपर्यंत तिसरी यादी जाहीर करु असे सांगितले आहे. त्यामुळं आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या तिसऱ्या यादीत कोणाचा नंबर लागतो हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे. कारण अनेक मतदारसंघातील उमेदवारांची नावे शरद पवार गटाने गुलदस्त्यात ठेवली आहेत

---

**मध्य आणि दक्षिणचा काँग्रेसला विसर**

# तिसऱ्या यादीतही सोलापूरकरांचा विरस

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी अखिल भारतीय काँग्रेस महासमितीने शनिवारी रात्री उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या दक्षिण सोलापूर आणि शहर मध्य या दोन्ही मतदार संघातील उमेदवारांची घोषणा केलेली नाही. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. दक्षिण सोलापूरमधून महाविकास आघाडीत घटक पक्ष असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून अमर पाटील यांच्या नावाची घोषणा या अगोदरच करण्यात आली आहे. माजी आमदार दिलीप माने यांनी शुक्रवारी शक्तीप्रदर्शन करत दक्षिण सोलापूरची जागा काँग्रेसलाच मिळावी अशी मागणी केली. दरम्यान शनिवारी सायंकाळी सिद्धेश्वर साखर कारखान्याचे मार्गदर्शन संचालक धर्मराज काडादी यांच्या समर्थकांनी बैठक घेऊन ही हक्काची जागा काँग्रेसलाच मिळावी, अशी मागणी केली.

माने समर्थकांच्या बैठकीवेळी काँग्रेसचे शहरअध्यक्ष चेतन नरोटे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांचा हवाला देऊन दक्षिण सोलापूरची जागा काँग्रेसकडेच असल्याचा दावा केला होता. मात्र तिसऱ्या यादीत दक्षिण उमेदवारी बाबत उल्लेख नसल्याने काँग्रेस श्रेष्ठींनी ही जागा सोडून दिली की काय असा संशय कार्यकर्त्यांमध्ये बळावला आहे.

दरम्यान आघाडीमधून शहर मध्यची जागा मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाला मिळावी अशी मागणी माजी आमदार नरसय्या आडम यांनी लावून धरले आहे. आघाडीमधून शहर मध्यची जागा कोणत्या पक्षाला देण्यात आली आहे. याचे स्पष्टीकरण अद्याप दिले गेलेले नाही. या मतदार संघात काँग्रेसकडून उमेदवार घोषित न केल्याने शहर मध्यची जागा माकपला दिली की काय, असे संशय कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

---

# अवताडेंचे 'समाधान', सातपुते वाऱ्यावरच!

## भाजपाचे १२१ उमेदवार फडणवीसांचा वरचष्मा



✔ मुंबई/प्रतिनिधी

उमेदवाऱ्या जाहीर करण्यात सर्वात पुढे राहिलेल्या महायुतीमधील घटक पक्ष भाजपनं शनिवारी (ता.२६) आपल्या २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. पंढरपुरातून विद्यमान आमदार आवताडेंचे पुन्हाउमेदवारी देऊन 'समाधान' करताना त्यांचे प्रतिस्पर्धी इच्छुक उमेदवार माजी आमदार प्रशांत परिचारक यांचा मात्र पत्ता कट केल्याचं समोर आलं आहे. शिवाय शिंदे शिवसेनेची सोलापूर शहर मध्यची जागा स्वत:कडे घेऊन उमेदवार देवेंद्र कोठे यांनी पक्षानं आखाड्यात उतरवलं आहे.

दरम्यान, भाजपने यापूर्वी ९९ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर आज २२ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये अखेर पंढरपूरचा सस्पेंन्स सुटला आहे. पुन्हा समाधान आवताडे यांनाचं उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळं प्रशांत परिचारक आता काय निर्णय घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. ते पवार गटाकडून निवडणूक लढवणार असल्याची देखील चर्चा सुरु आहे. तसेच भगीरथ भालके हे देखील शरद पवार गटाकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. मात्र, शरद पवार उमेदवारीची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात टाकतात हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

### आमदार सातपुतेंचा निर्णय मागेच; माढा, करमाळा नेमकं काय ते कळेना



भाजपनं १२१ उमेदवाऱ्या जाहीर केल्या आहेत. विद्यमान आमदार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीमधील इच्छुक चेहऱ्यांची वर्णी या पक्षाच्या उमेदवारीच्या दोन याद्यांमध्ये लागली आहे. वास्तविक माळशिरसचे आमदार राम सातपुते हे या खेपेची निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. ते विद्यमान आमदार आहेत शिवाय उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या मर्जीमधील आहेत. तरीपण दोन्ही याद्यांमध्ये त्यांचे नाव आलेले नाही. शिवाय माढा आणि करमाळ्याच्या जागेसंबंधी भाजप कोणती भूमिका घेणार, हे अद्याप गुलदस्त्यातच राहात आहे. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतल्यानं भाजपनं इथल्या जागेवर उमेदवार उभा करण्याच्या हालचाली केल्या पण उमेदवारांच्या यादीत करमाळ्याचा समावेश नाही. त्यामुळे इथला निर्णय कळत नाही. शिवाय माढ्याची जागा महायुतीमध्ये शिवसेनाच्या ताब्यामधील आहे, ती जागा भाजप घेणार की सेनेकडेच राहणार, हा निर्णय होताना दिसत नाही.



### काका-पुतण्या वेगवेगळ्या पक्षाकडून आखाड्यात

माजी महापौर महेश कोठे यांना यापूर्वीच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून सोलापूर शहर उत्तर विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर केली आहे. शनिवारी (ता.२६) त्यांचे पुतणे माजी नगरसेवक देवेंद्र कोठेंना भाजपकडून सोलापूर शहर मध्यसाठी उमेदवारी घोषित झाली. कोठे परिवारातून काका-पुतण्या एकाच वेळी विधानसभेची निवडणूक लढवत आहेत. दोघांचे पक्ष वेगळे आणि मतदारसंघदेखील वेगळे आहेत.

### भाजपच्या १२१ उमेदवाऱ्यांवर फडणवीसांचा वरचष्मा

भाजपकडून आत्तापर्यंत १२१ उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत. भाजपच्या दुसऱ्या यादीतही देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील नेत्यांनाच संधी मिळाल्याचं पाहायला मिळत आहे. भाजपच्या दुसऱ्या यादीत जतमधून गोपीचंद पडळकर यांना संधी देण्यात आली असून अकोल्यातून विजय अग्रवाल यांना उमेदवारी मिळाली आहे. तर, नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. यासह, पुण्यातील तीन मतदारसंघात उमेदवार जाहीर झाले असून खडकवासलामधून भीमराव तापकीर, पुणे कंन्टोनमैंट मतदारसंघातून सुनिल कांबळे, कसबा पेठ मतदारसंघातून हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

---



# माझा निर्णय पवार अन् शिंदेच घेतील

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दक्षिण सोलापूरसह जिल्ह्यात सुरू असलेले द्वेषाचे राजकारण थांबले पाहिजे. कुरघोडीच्या वृत्तीमुळे तालुक्याचा खुंटलेला विकास मार्गी लावण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणे आवश्यक आहे. समाजातील शेवटच्या घटकाच्या हितासाठी ज्येष्ठ नेत्यांच्या आणि तालुक्यातील प्रमुख नेते आणि जनतेच्या आग्रहामुळे आपण महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. आता जनभावना लक्षात घेतल्या पाहिजेत. शेवटी आपल्या उमेदवारीबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे हे जो काही निर्णय घेतील, तो स्वीकारू, अशा शब्दात सिध्देश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. शनिवारी, काडादी यांच्या गंगा निवास' या बंगल्यावर सिध्देश्वर परिवाराचा विचारविनिमय मेळावा झाला.

### गंगा निवासात मांडली काडादींनी भूमिका

धर्मराज काडादी आगे बढो, हम तुम्हारे साथ है', कोण म्हणतंय देत नाही? घेतल्याशिवाय राहत नाही', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. युवक कार्यकर्ते आणि समर्थकांकडून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. या बैठकीत उपस्थित नेत्यांनी आक्रमक शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. तोच धागा पकडून काडादी म्हणाले, सगळ्यांच्याच भावनांशी मी सहमत असेनच असे नाही. पण कार्यकर्त्यांच्या भावनाही समजून घेतल्या पाहिजेत. या भावना स्वाभाविक आहेत. गेल्या १० वर्षांत मला खूप त्रास झाला. श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडल्यामुळे त्यांना उत्तर देणे गरजेचे होते. चिमणीच्या प्रकरणात शरद पवार यांनी खूप मदत केली. मी पूर्वी इच्छुक नव्हतो. पवार यांच्या आग्रहामुळे मी निवडणूक लढविण्यासाठी तयार झालो. तालुक्यातून आणि शहरातील मतदारांशी संवाद साधताना चांगला प्रतिसाद मिळाला. लोकांनी आपल्या उमेदवारीचे स्वागत केले. पवार यांच्या भेटीप्रसंगी आपण राष्ट्रवादीचा अर्ज भरला. हे सगळे सहज घडले. परंतु महाविकास आघाडीच्या कोणत्याही पक्षाकडून निवडणूक लढविण्यास आपण तयार आहोत, याबाबत वरिष्ठांनी निर्णय घ्यावा, अशा शब्दात काडादी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. बैठक बोलाविण्याचे प्रयोजन सांगताना काडादी म्हणाले, दबाव निर्माण करण्याचा उद्देशाने ही बैठक बोलाविण्यात आली नाही. आमचा तसा कोणताच उद्देश नाही. मात्र गेल्या दहा-बारा दिवसांत घडलेल्या घटनांचा खुलासा व्हावा, आपल्या परिवारातील वस्तुस्थिती समजावी म्हणून ही बैठक बोलाविण्यात आली होती.

### कर्मयोगी अप्पासाहेब काडादी काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होते



कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांनी सोलापुरात काँग्रेसची स्थापना केली. काँग्रेस रूजविण्यात आणि वाढविण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. सोलापूर नगर परिषदेचे काँग्रेसचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी शहर विकासाचा पाया रचला. याशिवाय काँग्रेसचे पहिले आमदार म्हणून तत्कालीन अक्कलकोट-दक्षिण सोलापूर मतदारसंघातून ते विजयी झाले होते. नंतरच्या काळात काँग्रेसचे पहिले खासदार होण्याचा मानही त्यांच्याकडे जातो. हा इतिहास आहे. सोलापूरमध्ये काँग्रेस पक्ष रूजविण्यात आणि वाढविण्यात काडादी परिवाराचे योगदान महत्त्वाचे असल्याचे धर्मराज काडादी यांनी सांगितले.

### पाडापाडीच्या राजकारणात नाही रस

पाडापाडीच्या राजकारणात मला रस नाही, त्यामुळे विधानसभेची उमेदवारी मागण्यासाठी मी कोणाकडेही जाणार नाही.मला कोणत्याही पदाची अपेक्षा नाही. जनतेची श्रध्दा हेच माझे सर्वात मोठे पद आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघाचा उमेदवार हे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे ठरवतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### अमर पाटील हे आपलेच

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून दक्षिण सोलापूर मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झालेले अमर पाटील यांनी काडादी यांची भेट घेतली होती. त्या भेटीनंतर पाटील समर्थकांकडून काडादी यांचा आपल्याला पाठिंबा अशा पोस्ट व्हायरल झाल्या होत्या. त्यावर काडादी म्हणाले, अमर पाटील हे आपलेच आहेत. सिद्धेश्वर सहकरी साखर कारखान्यात ते संचालक आहेत. त्यांच्या उमेदवारीला माझा विरोध असण्याचे कारणच नाही.